







# विकासनामा

## देव देश धर्मासाठी

चिन्ह **कमळ**

-प्रभाग क्रमांक-

**४१**

**महादेववाडी उंड्री-पिसोळी**



भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार

# अतुल नारायण तरवडे

सर्वसाधारण पुरुष - ड

अ. क्र. **२**

# पायाभूत सुविधा | ड्रेनेज व पाणी व्यवस्थापन | स्वच्छता व पर्यावरण

## सक्षम व स्वच्छ प्रभाग घडवण्यासाठी ठोस काम

प्रभागातील नागरिकांचे  दैनंदिन जीवन सुकर व्हावे, वाहतूक सुलभ व्हावी आणि पावसाळ्यात नागरिकांना त्रास होऊ नये, या उद्देशाने पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला.

तरवडे वस्ती–आंबेकर मळा–कृष्णानगर परिसरात ₹१० लाख निधीतून रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आली. तरवडे वस्ती–कृष्णानगर रस्त्याचे लोकार्पण करून नागरिकांचा दीर्घकालीन प्रश्न मार्गी लावला.

हेवन पार्क परिसरातील अंतर्गत रस्त्यांवर स्वखर्चातून मुरूमीकरण करून रहदारीसाठी रस्ते खुले करण्यात आले. महादेववाडी, साठेनगर, काळेपडळ, उंड्री–पिसोळी भागात वेळोवेळी रस्ते दुरुस्ती व खड्डे बुजवण्याची कामे करण्यात आली.













## तात्पुरते नव्हे कायमस्वरूपी उपाय!

राजीव गांधी कॉलनी, केदारीनगर, वैजयंता कॉलनी आणि संपूर्ण डोंगर भागात बुस्टर पंप बसवून पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यात आला. वाडकर मळा परिसरात पावसाचे पाणी साचू नये म्हणून स्वखर्चातून पावसाळी लाईन टाकली. अनेक सोसायट्यांमध्ये जेटिंग व सक्शन मशीनद्वारे ड्रेनेज सफाई, तसेच सेप्टिक टँक क्लिनिंग करून आरोग्यदृष्ट्या सुरक्षित वातावरण निर्माण केले.









## स्वच्छ परिसर, निरोगी जीवन

पर्यावरणपूरक गणेश विसर्जनासाठी फिरता हौद व मूर्ती संकलन केंद्र सुरू करण्यात आले.

हेवन पार्क परिसरातील वन विभागाच्या जागेवर वृक्षारोपण मोहीम राबवली.

कचरा व्यवस्थापनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करून स्वच्छतेची सवय रुजवण्याचा प्रयत्न केला.











# धार्मिक-सांस्कृतिक उपक्रम वारी व सेवा महिला सक्षमीकरण



## परंपरा जपणारे नेतृत्व

प्रभागात सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक ओळख आणि अध्यात्मिक वातावरण टिकून राहावे यासाठी विविध उपक्रम सातत्याने राबवले.

ह.भ.प. इंदूरीकर महाराजांचे सुश्राव्य कीर्तन, दरवर्षी शिवजयंती उत्सव, अतिभव्य दहीहंडी उत्सव (प्रचंड जनसहभाग), छत्रपती संभाजी महाराज महानाट्य, स्व. पांडुरंग (अप्पा) तरवडे यांच्या स्मरणार्थ 'ऋणानुबंध पुरस्कार', लक्ष्मी पार्क येथील श्री गणेश मंदिराचे लोकार्पण अशा अनेक उपक्रमांतून प्रभागाची सांस्कृतिक ओळख अधिक मजबूत करण्यात आली.






## तीन दशकांची अखंड सेवा

तीन दशकांहून अधिक काळ वारकरी सेवेची परंपरा अखंड सुरू आहे. पालखी मार्गावर स्वखर्चातून ११ नळ्या टाकून पुलाचे काम पूर्ण करण्यात आले. आषाढी एकादशीनिमित्त फराळ वाटप. पंढरपूर, तुळजापूर, येडेश्वरी, अंबाबाई, आदमापूर दर्शन यात्रा, ज्येष्ठ नागरिकांना श्री विठ्ठल–रखुमाई दर्शन घडवून आणले तसेच तब्बल २५०० हून अधिक माता भगिनींना उज्जैन अधिपति श्री महाकाल यात्रा घडवून आणली.

















## महिलांचा सन्मान, हा आमचा अभिमान

महिला दिनानिमित्त महिला मेळावा व साडी वाटप, 'छावा' चित्रपटाचे विशेष प्रदर्शन, होम मिनिस्टर, हळदी कुंकू कार्यक्रम, तसेच स्वच्छता महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान महिलांच्या सहभागातून समाज अधिक सक्षम व्हावा, हा उद्देश ठेवण्यात आला.

# शिक्षण व युवक | आरोग्य | प्रशासन सुलभीकरण | सामाजिक बांधिलकी



### पिढ्या घडवण्याचं काम

बालदिन साजरा करून खाऊ, भेटवस्तू व सायकल वाटप करण्यात आले.

गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व प्रवेशासाठी मदत दिली.

युवकांसाठी क्रीडा व कौशल्यविकास उपक्रम राबवून त्यांना सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न केला.

### शासकीय लाभ.

नागरिकांना आयुष्यमान भारत कार्ड, मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड, विविध दाखले मिळवून देण्यासाठी शिबिरे घेतली. स्थानिक भाजीपाला विक्री केंद्र सुरू करून शेतकरी व ग्राहक दोघांनाही लाभ मिळवून दिला. बसस्टॉप सुविधांमध्ये सुधारणा केली.

चिन्ह कमळ

### संकटात पाठिशी उभे

नागरिकांसाठी २१ तपासण्यांचे आरोग्य शिबिर,

रक्तदान शिबिरे, नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया आयोजित केल्या.

कोरोना काळात ॲम्ब्युलन्स, बेड, रेमडेसिवीर, प्लेटलेट्स उपलब्ध करून देत अनेकांचे प्राण वाचवण्याचा प्रयत्न केला.

### समाजाशी नातं जपणारी भूमिका

स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण व तिरंगा वाटप,

कोल्हापूर पूरग्रस्तांसाठी मदत,

श्रीराम जन्मभूमी प्राणप्रतिष्ठा निमित्त लाडू वाटप करून आनंदोत्सव साजरा केला.










प्रकाशक : हर्षल आल्हाट, संतोष साळवी, किरण काळभोर, मयूर डांगमाळी | मुद्रकः सागर ग्राफिक्स | प्रति-१०००

## पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६

**२** **तरवडे अतुल नारायण**
**TARAWADE ATUL NARAYAN**



यांना **कमळ** चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड बहुमताने विजयी करा !

मतदान : गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ | वेळ : सकाळी ७.30 ते सायं. ५.३० पर्यंत